# प्रेसनोट

जा.क्र. ३५६ /माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस उप अधिक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक :— ११/०७/२०१८

## "चोरटे गृह अतिक्रमन करून दुखापत करणाऱ्या आरोपीस चार वर्ष सश्रम कारावास व द्रव्यदंडाची शिक्षा"

कारधा येथिल तक्रारदार विष्णु महादेव खंगार यांचे घरी ईसम नामे राजेश उर्फ राजु भरत उके, रा. कारधा ता. जिल्हा भंडारा याने रात्री दरम्यान चोरी करण्याचे उद्देशाने गृह प्रवेश करून तक्रारदार यास जबर दुखापत केल्याची आरोप सिध्द झाल्याने आज दिनांक ११.०७.२०१८ रोजी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायालय भंडारा चे न्यायाधिश श्री. संजय देशमुख सा. यांनी आरोपीस चार वर्ष सश्रम कारावास व ५०००/— रूपये द्रव्यदंडाची शिक्षा ठोठावली.

याबाबत अधिक माहिती अशी की, दिनांक १७.०४.२०१६ रोजी रात्र दरम्यान तक्रारदार आपले घरी असतांना आरोपी नामे राजेश उर्फ राजु भरत उके, रा. कारधा याने रात्री २.०० वा. सुमारास तक्रारदार याचे घराचे मागील दारातुन चोरी करण्याचे उद्देशाने गृह प्रवेश केला. तक्रारदार यास आवाज आल्याने घराचे मागील दाराकडे जात असता राजेश उके याने लोखंडी कात्याने तक्रारदार यास मारून जबर दुखापत केली अशी विष्णु महादेव खंगार याने पो.स्टे. कारधा येथे तोंडी तक्रार दिलेवरून, अपराध क्र. ३९/१६ प्रमाणे गुन्हा नोंद केला.

सदर गुन्हयाचा प्राथमिक तपास पो.हवा. मनगटे/६८६ यांनी केला. राजेश भरत उके यास गुन्हयात अटक करून गुन्हयात वापरलेला हत्यार जप्त करून तपास केला. पुढील तपास सहा. पोलीस निरीक्षक आर. एच. इंगोले यांनी करून साक्षपुरावा गोळा केला. आरोपी विरुध्द योग्य व सबळ पुरावे मिळुन आल्याने कलम ४५९ भादवि अन्वये दोषारोप पत्र जिल्हा व सत्र न्यायालय भंडारा येथे दाखल केले. सदर आरोपपत्रास केस क्र. ३०/१७ अन्वये सुनावणी करीता ठेवण्यात आले.

सदर गुन्हयाची सुनावणी अतिरीक्त **सत्र न्यायाधिश श्री. संजय देशमुख सा.** यांचे न्यायालयात चालली गुन्हयात सरकार पक्षातर्फे **ॲडव्होकेट श्री. विश्वास तवले, सहा. सरकारी**

सदर गुन्हयाची सुनावणी अतिरीक्त **सत्र न्यायाधिश श्री. संजय देशमुख सा.** यांचे न्यायालयात चालली गुन्हयात सरकार पक्षातर्फे **ॲडव्होकेट श्री. विश्वास तवले, सहा. सरकारी अभियोक्ता**, सत्र न्यायालय भंडारा यांनी योग्य बाजु मांडुन साक्षदार तपासले. आज दिनांक ११.०७.२०१८ रोजी गुन्हयाचे स्वरूप व गंभिरता लक्षात घेवुन राजेश उर्फ राजु भरत उके, वय ३५ वर्ष, रा. कारधा याचे विरूध्द **कलम ४५७ भादवि** अन्वये दोषसिध्द झाल्याने **चार वर्ष सश्रम कारावास व ५०००/– रूपये दंड, दंड न भरल्यास ६ महिणे कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली.** सदर गुन्हयात पोलीस निरीक्षक, गजानन कंकाळे, ठाणेदार पोलीस ठाणे कारधा यांचे मार्गदर्शनात पोलीस हवालदार, सिताराम ब्राम्हणकर/७१ यांनी योग्य पैरवी अधिकारी म्हणुन कामकाज केले.

(एम.एच.कोरेटी)
पोलीस निरीक्षक,
जिल्हा विशेष शाखा,
दुरध्वनी क्र.०९५२२५३८६७२

**प्रति,**

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत:** संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.